# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ३१/०३/२०१७

## *गडचिरोली जिल्हयातील अल्पवयीन मुलींना पळवून नेवून वेशा व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या टोळीतील आरोपींना शिक्षा*

- *सर्चच्या संचालीका डॉ. राणी अभय बंग यांनी पोलीसात दिली होती तक्रार*

*मा. विशेष सत्र न्यायाधिश श्री. यू. एम. पदवाड, गडचिरोली यांचा न्यायनिर्णय*

सविस्तर वृत्त असे की,..... दिनांक २७/०७/२०१३ रोजी डॉ. राणी बंग यांना ई मेल वरुन माहिती मिळाली की, गोवा येथील अर्ज या संस्थेनी ३ मुलींना बार्डेज गोवा येथील दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते. त्या पिडीत मुली गडचिरोली जिल्हयातील असल्याचे सांगण्यात आले. संबंधीत ई मेलवरील पत्त्यावर संपर्क साधला असता त्या मुली शरीर विक्रयाचया धंदयात असल्याचे कळले. त्यानंतर डॉ. राणी बंग यांनी त्यांच्या वडीलांकडे संपर्क साधून त्या मुलींना गोव्याहून परत आणले. काही मुली गोवा येथे चंद्रपूर जिल्हयातील सुध्दा होत्या व त्या परत आल्याची माहिती कळली. डॉ. राणी बंग यांना अधीक चौकशीअंती असे कळले की, आरो
ी शबनम ऊर्फ छाया ही तीच्या नवऱ्याचे नात्यात असलेल्या पिडीत मुलींना नागपूर येथे पाणी पाऊच फॅक्ट्रीमध्ये काम मिळत आहे अशी खोटी बतावणी करुन तीचा भाऊ आरोपी धमेंद्र याच्या मार्फतीने गडचिरोली जिल्हयाचे विविध ठिकाणाहून नेवून वेशा व्यवसाय करण्यास भाग पाडत होते. सदर प्रकरणाची तक्रार फिर्यादी डॉ. राणी बंग यांनी दिनांक ०९/०८/२०१३ रोजी गडचिरोली पोलीस स्टेशन येथे दाखल केली. त्यावरुन अप.क्र. १३५/२०१३ नोंद करुन गुन्हा तपासात घेतला व सदर प्रकरणात आरोपी नं. १ धमेंद्र गणपत शेडमाके, रा. वडधा, ता. आरमोरी, २. सुरेश ऊर्फ सुर्यभान सखाराम शेडमाके, रा. डार्ली, ता. आरमोरी, ३. प्रतीमा चैताराम निखारे, रा. नंदनवन कॉलनी, नागपूर, ४. कवीता महेंद्र भुजाडे, रा. सिध्देश्वर नगर नागपूर, ५. प्रतिभा ईश्वर चव्हाण, रा. जगनाडे चौक, नागपूर, ६. शब्बू ऊर्फ शालीनी अजहर खान, रा. नंदनवन, नागपूर, ७. अर्चना राजू पेंदाम, रा. चनकाईनगर, गडचिरोली, ८. पुजा चैतू धुर्वे, रा. चातगांव, ता. धानोरा, ९. कशीश गेंदलाल घोरपडे, रा. रामटेकनगर, १०. पल्लवी प्रभाकर मानकर, रा. कुरखेडा, ११. शंकी ऊर्फ शंकर मारोतराव मानवटकर, रा. रेवतीनगर नागपूर यांना पोलीसांनी अटक केली. तपासामध्ये पिडीत मुलींना नागपूर व गोवा येथे वेशा व्यवसाय करण्यास भाग पाडल्याबद्दल तसेच त्यांना नोकरीचे आमीष दाखवून पळवून नेल्याबाबत

व बलात्कार केल्याबाबत कलम ३७६, ३६६-अ, ३७२ भा.द.वि., कलम ४ व ५ अनैतीक देहविक्रय प्रतिबंधक कायदा तसेच कलम ११ बा.लै.अ.सं. कायद्यान्वये आरोपी धर्मेंद्र सुरेश व उषा यांना प्रत्येकी ७ वर्ष सश्रम कारावास रु. ८,०००/- दंड व आरोपी प्रतिभा, शब्बू ऊर्फ शालीनी यांना प्रत्येकी ५ वर्ष सश्रम कारावास व रु. १,०००/- दंड ठोठावला. आरोपी पुजा, पल्लवी व कविता या प्रकरण न्यायालयात चालू असतांना फरार झाल्या तर आरोपी शंकी ऊर्फ शंकर व कशीश घोरपडे यांना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त करण्यात आले.

सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी अभियोक्ता श्री. अनिल प्रधान यांनी १७ साक्षदार तपासले व सरकारी पक्षाचा युक्तीवाद ग्राहय मानून आरोपींना न्यायालयाने शिक्षा ठोठावली. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक जी. व्ही. पलंगे यांनी केला. पैरवी अधिकारी म्हणून श्री. जयेश खंदरकर पोलीस उपनिरीक्षक यांनी काम पाहीले.